शासकीय कर्मचा-यांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रूग्णालयात घेतलेल्या औषधोपचारांच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत मार्गदर्शक तत्वे.....

महाराष्ट्र शासन,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्र. एमएमजी/१०९२/१६९२/सीआर-२३३/९२/आरोग्य-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १९ डिसेंबर, १९९२.

वाचा:- १] शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी/१०८१/४९०७/ पीएच-९ अ, दिनांक १९ ऑक्टोबर १९८३.

२] शासन पूरकपत्र, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी/१०८१/४९०७/ पीएच-९ अ, दि. १९ ऑक्टोबर १९८४.

३] शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी/१०८६/४९३७/ पीएच-९, दिनांक ३० जुलै, १९८७.

४] शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी/१०८६/४९०७/ आर-९, दिनांक १ सप्टेंबर १९८७.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी/१०८१/४९०७/पीएच-९ अ, दिनांक १९-१०-१९८३ व पूरकपत्र क्र. एमएजी/१०८१/४९०७/पीएच-९ अ, दि. १९-१०-१९८४ आणि शासन निर्णय क्र. एमएजी/१०८६/४९०७/आरोग्य-९, दि. १-९-१९८७ नुसार शासकीय कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रूग्णालयात अंतररूग्ण म्हणून घेतलेल्या औषधोपचाराच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी अनुक्रमे १३, ५ व ३ अशा एकूण मिळून २१ आकस्मिक आजारांना मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये आणखी २ आजारांचा समावेश करण्यात येत आहे. तो खाली नमूद केल्याप्रमाणे :-

१] इपिलेप्सी [EPILEPSY ]

२] ॲक्युट ग्लॅकोमा [ACUTE GLYCOMA ]

यास्तव एकूण खाली नमूद केलेल्या २३ आजारांस या आदेशाद्वारे आकस्मिक निकडीच्या प्रसंगी औषधोपचार घेण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

१] हृदयविकाराचा झटका [Cardiac emergency ] प्रमस्तिष्क संवहनी [Cerbro Vascular ] फुफ्फुसाच्या विकाराचा झटका [Pulmonary emergency ]

२] अतिरक्तदाब [Hypertension ]

धनुर्वात [Tetanus ]

४] घटसर्प [Diptheria ]

५] अपघात [Accident ] आघात संलक्षण [Shock Syndrom ] हृदयाशी आणि रक्तवाहिनीशी संबंधित [Cardiological and Vascular ]

( Acute abdominal pains Intestinal obstruction)

८] जोरदार रक्तस्त्राव ( Severe haemorrage)

९] गॅस्ट्रो-एन्ट्रायटिस ( Gastro-Entriotis)

१०] विषमज्वर (Typhoid)

११] निश्चेतनावस्था (Coma)

१२] मनोविकृतीची सुरुवात (Consot of Psychiatric disorder)

१३] डोळ्यातील दृष्टीपटल सरकणे (Retinal detachment in the eye)

१४] स्त्रीरोगशास्त्र आणि प्रसूतिशास्त्र संबंधित यांच्याशी आकस्मिक आजार
(Gynaecological and obstetric emergency)

१५] जनन-मूत्र आकस्मिक आजार (Conit-urinary emergency)

१६] वायू कोथ ( Gas Gangrine)

१७] कान, नाक व घसा यामध्ये विजातीय पदार्थ गेल्यामुळे निर्माण झालेले आकस्मिक आजार [Foreign body in Ear, Nose &throat Emergency)

१८] ज्यामध्ये तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक असते अशा जन्मजात असंगती.
( Cogenital Anamolies requiring urgent surgical intervention)

१९] एड्स

२०] ब्रेन टयुमर

२१] भाजणे

२२] इपिलेप्सी ( Epilepsy)

२३] ॲक्युट ग्लॅकोमा ( Acute Glycoma)

वरील परिच्छेद अनुसार देण्यात येणारी प्रतिपूर्ती शासन निर्णय क्र. एमएजी/१०८१/४९०७/पीएच-९ अ, दिनांक १९ ऑक्टोबर १९८३ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार देण्यात येईल. मात्र अशी प्रकरणे शासन निर्णय क्र. एमएजी/१०८६/३४३७/आर-९, दिनांक ३० जुलै १९८७ मध्ये नमूद केलेल्या संबंधित रुग्णालयांना व जिल्हा शल्य चिकित्सकांना सादर करण्यात यावीत.

हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने आणि त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८१५/९२/सेवा-५, दिनांक १९-९-१९९२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/- xxx
[ भा. ल. निकम ]
महाराष्ट्र शासनाचे अवरसचिव.

---

क्र. लेखा/६/आखलि/वशी/१७९,
जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी, दि. २१-४-१९९३.

प्रति,
तहसिलदार सर्व